# नाशिककरांनी अनुभवली समर्थांची टाकळी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक




समर्थ रामदासांचे कार्य घराघरापर्यंत पोहोचलेले असले, तरी टाकळीतील त्यांचे वास्तव्य अन् येथील मठरूप वारसा नव्याने उभा करेपर्यंतचा संघर्षमय प्रवास अजूनही अज्ञात आहे. समर्थांचा मठ अजूनही प्रेरणा देतो अन् जगण्याचा वेगळा अर्थ देतो, हे उमजलेल्या काही समर्थभक्तांनी हा मठ अथक प्रयत्नांतून नावारूपाला आणला... न्यायालयीन लढाई... अडचणींचा डोंगर... अजूनही संपलेली नाही. तरीही टाकळीतील मठ समर्थांचे कार्य जोमाने पुढे घेऊन जात आहे. नव्या पिढीने हा वारसा पुढे न्यावा अशी हाक देत आहे, त्याचा काहीसा वेगळा अनुभव देणारा 'मटा' हेरिटेज वॉक ठरल्याची प्रतिक्रिया नाशिककरांनी व्यक्त केली.

टाकळीतील समर्थांचा मठ, समर्थांची पादत्राणे, कुबडी, त्यांचे शब्दसाहित्य, मठातील गोमय हनुमान व रामासह इतर दुर्मिळ मूर्ती, समर्थांची ध्यानगुहा, समर्थकालीन वड, तसेच त्यांचा आकर्षक पुतळा अन् समर्थ मठाचा परिसर अनुभवण्याची संधी 'मटा हेरिटेज वॉक'मधून नाशिककरांना मिळाली. यावेळी मठाचे विश्वस्त सुधीर शिरवाडकर व ज्योतिराव खैरनार यांनी मठाचा इतिहास व मठाला नवे रूप देण्यासाठी समर्थभक्तांकडून ४३ वर्षे लढलेल्या लढ्याची माहिती दिली. मठाला जगभर पोहोचविण्यासाठी अन् नवीन इमारतीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती यावेळी त्यांनी दिली. समर्थ अभ्यासक मकरंद जोशी यांनी समर्थांचे निरनिराळे पैलू व समाधीची माहिती दिली. समर्थांचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी नाशिककरांनी पुढे येण्याची गरज शिरवाडकर व खैरनार यांनी व्यक्त केली. तसेच मठाधिपतींच्या समाधी व नंदिनी-गोदावरीचा संगमावर जाऊन समर्थांचे अनेक पैलू जाणून घेण्याचा प्रयत्न नाशिककरांनी केला. यावेळी नंदिनी नदीला पुनरुज्जीवन देण्यासाठी 'मटा'तर्फे सुरू असलेल्या प्रयत्नांचे हेरिटेज वॉकमध्ये सहभागी झालेल्या नाशिककरांनी कौतुक केले.

## समर्थ अभ्यास केंद्राची गरज

टाकळीतील समर्थ रामदास स्वामींचा मठ दुर्लक्षित असल्याने या मठाला नव्याने झळाळी देण्यासाठी मठात विविध उपक्रम राबविण्याची गरज आहे. समर्थांचे साहित्य आजच्या पिढीला येथे उपलब्ध नाही. हे साहित्य उपलब्ध करून येथे अभ्यास केंद्र उभे करण्याचा मठाचा मानस आहे. मात्र, यासाठी नाशिककरांनी साथ देण्याची गरज आहे. येथे समर्थ अभ्यास केंद्र सुरू झाल्यास तरुणाईची पावले मठाकडे वळतील, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त झाली.







समर्थांचे कार्य अन् मठरूपी वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. मात्र, अनेक बाबतीत न्यायालयीन लढे अजूनही सुरू आहेत. या अडचणी दूर झाल्यास मठाचे कार्य वेगाने पुढे घेऊन जाता येईल.

- सुधीर शिरवाडकर, विश्वस्त



समर्थभक्त व पर्यटकांनी हा मठ परिसर नेहमी गजबजलेला असतो. समर्थांचे साहित्य, कार्य व मठाचे विविध उपक्रम हेरिटेज वॉकसारख्या उपक्रमांमुळे सर्वांपर्यंत पोहोचत आहेत. मठाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित येऊन प्रयत्न करण्याची गरज आहे.

- ज्योतिराव खैरनार, विश्वस्त









